RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४०

दि. ३१ मे २०२६, वार : रविवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

दैनिक

# महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# मनोज जरांगेंचे उपोषण मागे : सरकारकडून सर्व मागण्या मान्य

## राधाकृष्ण विखे पाटलांची शिष्टाई यशस्वी; सातारा गॅझेटसाठी १ महिन्याचा वेळ

**जालना/प्रतिनिधी :** मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आज सकाळपासून आमरण उपोषणाला सुरुवात केली होती. उपोषणाच्या पहिल्याच दिवशी त्यांनी राज्य सरकारसमोर मोठी मागणी ठेवली. मराठा समाजाच्या कल्याणासाठी आपण हे आंदोलन करत असल्याचे सांगताना, सरकार बदलत राहतील, चर्चा सुरू राहतील; मात्र आपण उपोषणाच्या निर्णयावर ठाम असल्याचे त्यांनी स्पष्ट केले होते. दरम्यान, सरकारचे शिष्टमंडळ आज रात्री सुमारे साडेदहा वाजता मनोज जरांगे यांच्याशी चर्च करण्यासाठी आंदोलनस्थळी दाखल झाले होते.

शिष्टमंडळ आणि मनोज जरांगे यांच्यात अडीच तास चर्चा झाली. मनोज जरांगेंनी सरकारने दिलेल्या ड्राफ्टमध्ये काही बदल सूचवले. सरकारकडून मनोज जरांगेंच्या सूचना मान्य करण्यात आल्या. यानंतर मनोज जरांगे यांनी राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांच्या हस्ते पाणी पिऊन आपले उपोषण मागे घेतले.

**मनोज जरांगेंनी उपोषण केले स्थगित**

मनोज जरांगे आणि सरकारचे शिष्टमंडळ यांच्यात अडीच तास चर्चा झाली. मनोज जरांगेंनी सरकारने दिलेल्या ड्राफ्टमध्ये काही बदल सूचवले. सरकारकडून देखील मनोज जरांगेंच्या सूचना मान्य करण्यात आल्या. यानंतर मनोज जरांगे यांनी राधाकृष्ण विखे पाटील आणि प्रसाद लाड यांच्या हस्ते पाणी पिऊन आपले उपोषण मागे घेतले.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मुंबईच्या आंदोलनानंतर जरांगे पाटलांच्या पुढाकाराने अनेक विषयांबद्दल राज्य शासनाचे निर्णय झाले. त्याची अंमलबजावणी सुरू आहे. पण काही निर्णयांबद्दल अजूनही संधिगता होती. त्यासाठी त्यांनी पुन्हा आजपासून आंदोलन सुरू केले होते. आपल्या राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्त्वाखाली पूर्वी आपल्या समाजबांधवांना भूमिका त्यांनी घेतली. मागच्या आंदोलनातही फडणवीसांच्या पुढाकारानेच आपण समाजबांधवांसाठी वेगवेगळे निर्णय घेतले. आता या आंदोलनात जरांगेंनी ज्या मागण्या केल्यात, त्यांच्या अंमलबजावणी संदर्भात सकारात्मक भूमिका घेतली.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मी आणि प्रसाद लाड दोघेही मनोज जरांगेंचे आंदोलन सुरू झाल्यापासून सातत्याने त्यांच्या संपर्कात होतो. मागील काही निर्णयांमध्ये अडकलेल्या त्रुटी आहेत, त्याचे वाचन जरांगेंनी केली. तत्पूर्वी अभ्यासकांसोबत चर्चा झाली. त्यात दोन-तीन सुधारणा करण्याचे सुचवले, त्या आम्ही केल्यात. जरांगे पाटलांनी निस्वार्थीपणे समाजासाठी घेतलेला पुढाकार, वेळोवेळी केलेली आंदोलने यांमुळे मराठा समाजबांधवांना आज मोठा प्रमाणात न्याय मिळत आहे.

राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मला खात्री आहे की, आजच्या झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने शासनाने घेतलेले निर्णय, शासनाने सादर केलेल्या प्रस्तावाला मनोज जरांगेंनी मान्यता दिली. त्यावर आम्ही पुढील दोन-तीन शासन निर्णय काढू, त्यावर आम्ही अंमलबजावणी सुरू करतोय. म्हणून मी आपल्या सर्वांच्या वतीने मनोज जरांगेंना मनापासून धन्यवाद देतो. मी आणि प्रसाद लाड यासंबंधी आम्ही सातत्याने चर्चेमध्ये केलेल्या कार्यवाहीला जरांगे पाटील यांनी संमती दिली. समाजबांधवांनी संमती दिली. मी आपल्या सर्वांच्या वतीने मनोज जरांगेंना विनंती करतो, की त्यांनी समाजबांधवांच्या हिताकरिता आपले सुरू केलेले उपोषण स्थगित करावे.

**मनोज जरांगे म्हणाले - कुणबी नोंदी**





**सापडलेल्यांना प्रमाणपत्र देण्यात येणार**

मनोज जरांगे म्हणाले की, सरकारच्या शिष्टमंडळाने ड्राफ आणला की आपण सुद्धा अभ्यासाक बोलवले. आपण ज्या मागणी केल्या होत्या त्यावर त्यांनी मसुदा तयार होणार आहे. ते सांगतात की ५८ लाख कुणबी नोंदी सापडल्या, त्याचा डाटा द्या म्हटले तर ते हो म्हणाले. जे ५८ लाख नोंदी सापडल्यात त्यांचे कुणबी प्रमाणपत्र द्या. दिलेल्या प्रमाणपत्राच्या व्हॅलेडीटी द्या, विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून १५ दिवसाला आढावा घेणार. म्हणजे आपले एक काम इथे झाले. ५८ लाख नोंदीचे प्रमाणपत्र न दिल्यास संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या जाणार आहेत.

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, हैदराबाद गॅजेटची इथून पुढे अडचण येणार नाही. मराठा आणि कुणबी याला स्वतंत्र मंत्रालय स्थापन करा हे त्यांना सांगितला आहे. मंत्रालयासाठी मी महिनाभर थांबणार नाही, ना मंत्रालय आहे आपल्याला का नाही? मराठा मंत्रालय करण्यासाठी एका महिन्याची गरज नाही. सातारा संस्थांच्या जीआर मला लगेच पाहिजे असं माझं मत होत. मात्र काही गडबडडीत काढलं तर टिकणार नाही असं त्याच म्हणणं आहे. अभ्यासाकाच सुद्धा म्हणणं आहे सातारा गॅजेटच्या जीआर साठी एक महिना थांबल पाहिजे.

**सातारा गॅझेटीयरसाठी एक महिन्याचा वेळ**

मनोज जरांगे पाटलांनी म्हटले की, सातारा गॅझेटीयर लागू करण्यासाठी एक महिन्याचा वेळ दिला. ज्यांचे कुणबी प्रमाणपत्र निघाले त्यांना व्हॅलिडिटी दिली पाहिजे. याबाबतचा आदेश काढतो असा शब्द तुम्ही मला द्यावा. जर व्हॅलिडिटीला अडचण आली तर विखे पाटील यांच्याकडून एक हेल्पलाईन नंबर जाहीर करण्यात आला आहे. ज्यांचे कुणबी प्रमाणपत्र निघाल आहे त्यांच्या व्हॅलिडीटी रोखल्या नाही पाहिजे, आता ॲडमिशन घेण्याची वेळ आहे. नाहीतर मी तुमच्या दोघांना फोन करेल.


## पेपरफुटीचे टेन्शन मिटणार, नीट परीक्षेचा पॅटर्न बदलणार, सुप्रीम कोर्टाचा मोठा निर्णय

**मुंबई/प्रतिनिधी :** नीट पेपर फुटी प्रकरण आता कोर्टात गेले आहे. सुप्रीम कोर्टातून आज या पेपरफ ुटी प्रकरणाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. आता नीट परीक्षेचं स्वरुप बदलणार असून अधिक कठोर केलं जाणार आहे. नीटचे पेपर फोडले जाऊ नयेत यासाठी आता परीक्षेचं स्वरुपच बदलण्यात यावं याबाबत सरकारशी सल्लामसलत करून निर्णय घेण्याचे निर्देश कोर्टानं दिले आहेत. नीट परीक्षा आता संगणकीय पद्धतीनं ऑनलाइन घेण्याबाबत विचार सुरू आहे. यासंदर्भात सरकारशी चर्चा करून निर्णय घ्यावा असं कोर्टानं म्हटले आहे. देशभरात खळबळबळ माजवून सोडणाऱ्या छएएढ-णत्रः पेपर लीक प्रकरणाचा तपास आता एका अत्यंत महत्त्वाच्या टप्प्यावर पोहोचला आहे. दिल्लीच्या राऊस एव्हेन्यू कोर्टाने या प्रकरणातील अटक करण्यात आलेली आरोपी मनिषा वाघमारे हिच्या जामीन अर्जावर णँघ नोटीस पाठवली आहे. मागच्या १० दिवसांपासून सीबीआयच्या कोठडीत असलेल्या मनिषा वाघमारेची चौकशी पूर्ण झाल्यानंतर, न्यायालयाने आता तिची रवानगी न्यायालयीन कोठडीत केली. यानंतर तिने न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला असून, या जाम ीन अर्जावर येत्या मंगळवारी, म्हणजेच ५ जून रोजी सुनावणी होणार आहे.सीबीआयने न्यायालयात सादर केलेल्या प्राथमिक माहितीनुसार, मनिषा वाघमारे आणि प्रल्हाद कुलकर्णी या दोघांनी मिळून एक मोठा कट रचला होता. छएएढ-णत्रः परीक्षेचा गोपनीय पेपर लीक करणे आणि त्याचे बेकायदेशीरपणे वितरण करणे यामध्ये या दोघांचा थेट सहभाग असल्याचा गंभीर आरोप सीबीआयने केला आहे. या रॅकेटचे धागेदोरे कुठे कुठे पसरले आहेत, याचा शोध घेण्यासाठी सीबीआय अजूनही कसून तपास करत आहे. ५ जून रोजी होणाऱ्या सुनावणीकडे आता संपूर्ण देशाचे आणि विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे.

## ...नाहीतर दिल्ली- मुंबई दहशतवादी हल्ल्याने हादरली असती; वेळीच कट उधळला, दाऊद कनेक्शनमुळे खळबळ

**मुंबई/प्रतिनिधी :** देशावर दहशतवाद्यांसह परकीय शत्रूंची असणारी वक्रदृष्टी आणि त्यातूनच भारतातील हल्ल्यांचे रचले जाणारे कट याविरोधात देशातील संरक्षण यंत्रणा सतर्क झाल्या असून, नुकतीच एक मोठी कारवाई करण्यात आली. दिल्ली पोलिसांनी केलेल्या या कारवाईमध्ये एका धक्कादायक दहशतवादी हल्ल्याचा कट वेळीच उधळण्यात आला. जिथे आयएसआस या पाकिस्तानच्या गुप्तचर यंत्रणेच्या संपर्कात असणाऱ्या ९ जणांना अटक करण्यात आली. संशयास्पदरित्या दहशतवादी कृत्यांमध्ये सहभाहगी असणारे हे ९ जण देशाच्या राजधानीसह आर्थिक राजधानी मुंबईलासुद्धा हादरा देण्याचा मनसुबा बाळगून त्या अनुषंकानं कट रचत होते. दिल्ली, मुंबईसह बड्या शहरांमध्ये दहशतवादी हल्ला करत मोठा नरसंहार करण्याचा कट त्यांनी रचला होता. प्राथमिक माहितीनुसार अटकेत असणारे आरोपी हे दिल्ली, मुंबई आणि पंजाबचे असल्याचं सांगण्यात येतं. यापैकी काही परदेशी नागरिकत्वं असणारे असून, त्यांची पाळंमुळं थेट दाऊद इब्राहिम, अंडरवर्ल्डपर्यंत पोहोचल्याची माहिती समोर आली आहे.

## जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वयक समितीच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी लोकरे यांची निवड; भाजपा युवा नेते अजित पाटील कव्हेकरांच्या हस्ते सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाअंतर्गत आयोजित करावयाच्या रोजगार मेळाव्याच्या समन्वयासाठी राज्यस्तरीय, विभागस्तरीय व जिल्हास्तरीय समन्वयक समिती स्थापन करण्यात येत आहे. यामध्ये जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीच्या लातूर जिल्हाध्यक्षपदी सुरज लोकरे यांची निवड करण्यात आली असून भाजपाचे शहर जिल्हाध्यक्ष युवा नेते अजित पाटील कव्हेकर यांच्याहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी अमरदीप वायगावकर, युवा नेते विश्वजीत पाटील कव्हेकर, शिवाजी विद्यालय बिटरगावचे माजी मुख्याध्यापक सूर्यकांत चव्हाण, बाळासाहेब जाधव, अमोल शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते. त्यांच्या या निवडीबद्दल त्यांचे स्वागत करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंती दिनानिमित्त सांस्कृतिक कार्यक्रमाचे आज रवींद्र नाट्य मंदिर येथे आयोजन

**मुंबई/प्रतिनिधी :** लोकमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनकार्यावर आधारित भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन सांस्कृतिक कार्य संचालनालयांच्या वतीने रविवार, ३१ मे २०२६ रोजी सकाळी ९.०० वाजता मिनी थिएटर, रवींद्र नाट्य मंदिर, प्रभादेवी, मुंबई येथे करण्यात आले आहे.

भारतीय इतिहासातील आदर्श राज्यकर्त्या, न्यायप्रिय प्रशासक आणि लोककल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या अहिल्यादेवी होळकर यांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंग, त्यांचे सामाजिक कार्य, धर्मनिरपेक्ष दृष्टिकोन, स्त्रीशक्तीचे दर्शन घडविणारे नेतृत्व तसेच राष्ट्रनिर्मितीतील त्यांचे योगदान या कार्यक्रमातून प्रभावीपणे उलगडण्यात येणार आहे.

नृत्य, संगीत, अभिनय आणि दृश्यरचनांच्या माध्यमातून साकारण्यात येणाऱ्या या भव्य प्रस्तुतीतून प्रेक्षकांना अहिल्यादेवींच्या



जीवनसंघर्षाचा, प्रशासन कौशल्याचा आणि जनकल्याणकारी कार्याचा अनुभव घेता येणार आहे. ऐतिहासिक आशय आणि कलात्मक सादरीकरण यांचा संगम साधणारा हा कार्यक्रम सर्व वयोगटातील रसिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.

या कार्यक्रमाचे दिग्दर्शन आणि नृत्यदिग्दर्शन सुप्रसिद्ध कलावंत शशीन मेस्त्री (नृत्येश्वर) यांनी केले असून, नेपथ्य, वेशभूषा, प्रकाशयोजना आणि कलासादरीकरणाच्या माध्यमातून अहिल्यादेवींच्या जीवनाचा वैभवशाली प्रवास रंगमंचावर साकारण्यात येणार आहे.

हा कार्यक्रम सांस्कृतिक कार्य, इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या संकल्पनेतून तसेच सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला आहे.

या सांस्कृतिक कार्यक्रमाचा लाभ रसिक, इतिहासप्रेमी, विद्यार्थी तसेच सर्व नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक श्रीराम पांडे यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# लातूर जिल्ह्यात पेट्रोल, डिझेलचा पुरवठा सुरळीत; साठवणूक करू नका : जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड

- शेती, उद्योग-व्यवसाय व जलसंधारणाच्या कामांसाठी डिझेल पुरवठा करण्याची हमी
- अफवांवर विश्वास ठेवू नका; इंधनाचा तुटवडा निर्माण होणार नाही

**लातूर/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा पूर्णपणे सुरळीत असून आगामी काळातही यात कोणताही खंड पडणार नाही, अशी हमी पेट्रोलियम कंपन्यांनी दिली आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच अनावश्यक इंधनाची अतिरिक्त खरेदी किंवा साठवणूक करू नये, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी केले आहे.

लातूर जिल्ह्यातील पेट्रोल व डिझेल पुरवठ्याचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली नुकतीच जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्ह्यातील पेट्रोल पंप असोसिएशनचे पदाधिकारी व पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींची बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हाधिकाऱ्यांनी जिल्ह्यातील इंधनाच्या




उपलब्धतेचा सविस्तर आढावा घेतला. जिल्ह्याला आवश्यक असणारा पेट्रोल आणि डिझेलचा पुरवठा नियमितपणे सुरू असून भविष्यातही हा पुरवठा असाच अखंडित सुरू राहील, अशी माहिती पेट्रोलियम कंपन्यांच्या प्रतिनिधींनी यावेळी दिली.

ग्रामीण भागात सध्या मान्सूनपूर्व शेती मशागतीची कामे मोठ्या प्रमाणावर सुरू आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व पेट्रोल पंपांवर पेट्रोल आणि डिझेलचा पुरेसा साठा सतत उपलब्ध ठेवण्यात यावा आणि शेती मशागतीच्या कामासाठी शेतकऱ्यांना, तसेच उद्योग-व्यवसाय आणि जलसंधारणाच्या कामांसाठी आवश्यक असलेल्या प्रमाणात डिझेल तात्काळ उपलब्ध करून दिले जावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. पेट्रोलियम कंपन्यांनी यावर सकारात्मक प्रतिसाद दिला असून, जिल्ह्यात कुठेही पेट्रोल किंवा डिझेलचा तुटवडा निर्माण होणार नाही, अशी ग्वाही त्यांनी प्रशासनाला दिली.

नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता अतिरिक्त स्वरूपात पेट्रोल किंवा डिझेलची खरेदी करू नये. आवश्यक तेवढेच इंधन खरेदी करून पेट्रोल पंपांवरील अनावश्यक गर्दी टाळावी, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे. जिल्हा प्रशासन सर्व पेट्रोलियम कंपन्या व पेट्रोल पंप चालकांच्या सतत संपर्कात असून जिल्ह्यात पेट्रोल व डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

संपादकीय...

## विधानपरिषद निवडणूक अन् धडपड

महाराष्ट्राच्या राजकीय पटावर विधानपरिषद निवडणुकीचे ढग दाटले आहेत. १७ जागांसाठी १८ जून २०२६ रोजी मतदान आणि २२ जूनला निकाल अपेक्षित असताना महायुतीत जागावाटपाचा तिढा, शिंदे-फडणवीस यांच्यातील सूत्रीय तणाव आणि महाविकास आघाडीची रणनीती यामुळे वातावरण तापले आहे. ही निवडणूक केवळ १७ जागांची नाही तर महायुतीतील संतुलन आणि विरोधकांच्या पुनरुत्थानाची कसोटी ठरेल. सूत्रांच्या माहितीनुसार महायुती एकत्र लढणार असून, प्राथमिक फॉर्म्युला भाजप ११-१२ जागा, शिंदे शिवसेना ३-४ जागा, अजित पवार राष्ट्रवादी २ जागा असा आहे. भाजपकडे नागपूर, पुणे, अमरावती, सोलापूर, नांदेड, छत्रपती संभाजीनगर-जालना, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली आदी मजबूत मतदारसंघ आहेत. संभाजीनगर, नाशिकवरून त्यांचा शिंदेंशी वाद आहे. शिवसेनेला ठाणे, नाशिक, यवतमाळसारखे भाग मिळण्याची शक्यता, तर राष्ट्रवादीला रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि हिंगोली-परभणी सारखे मतदार संघ भाजप सोडू शकते. त्यांचा पुण्यावर दावा आहे. पण तो टिकेल असे वाटत नाही. भाजप तडजोडी आता आपल्या अटींवर करण्याइतका सक्षम आहे. मित्र पक्षांना काही बाबतीत मोकळीक दिली जात असली तरी याबाबतीत तडजोड होईल असे दिसत नाही. हा फॉर्म्युला अद्याप अंतिम नाही. शिंदे गट ५-६ जागांवर दावा ठेवून आहे, तर भाजपकडून ४ च्या आसपास देण्याची तयारी दाखवली जात आहे. यामुळे तिढा कायम आहे. यात कधीकाळी ठाकरे शिवसेनेने पाच जागा लढवलेल्या असल्याने भाजपकडून त्याहून कमी मिळवले तर शिंदे यांच्यासाठी ते नामुष्कीचे ठरणार आहे. त्यामुळेच प्रकरण दिल्लीपर्यंत जाऊन परत आले आहे आणि राज्यातच सोडवले जाईल असे सांगितले जात आहे. एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांच्यातील संबंधांवर अलीकडे अनेक चर्चा रंगल्या आहेत. वर्षा निवासस्थानी झालेल्या भेटीतही पूर्ण तोडगा निघाला नाही. शिंदे गटातील आमदार-मंत्र्यांमध्ये नाराजी आहे; सातारा जिल्हा परिषद, रायगडसह विविध ठिकाणी 'दुय्यम वागणूक' ची भावना व्यक्त होत आहे. काहींनी राजीनाम्याची धमकीही दिली. फडणवीस यांनी 'कोणताही दुरावा नाही' असे स्पष्ट केले असले तरी, जागावाटपावरून दिल्ली दौऱ्यांसह बैठका सुरू आहेत. भाजपची 'मोठा भाई' भूमिका आणि शिंदे गटाची 'समान भागीदारी'ची मागणी यात मुख्य खेचाखेच आहे. अजित पवार गट सध्या शांत असला तरी त्यांचाही वाटा सुरक्षित ठेवण्याची धडपड चालू आहे. ठाकरे शिवसेना महाविकास आघाडीत सक्रिय आहे. अलीकडे पार पडलेल्या विधानपरिषद निवडणुकीत अंबादास दानवे यांना उमेदवारी देऊन ठाकरे गटाने आपली इच्छा स्पष्ट केली. उद्धव ठाकरे स्वतः उमेदवार होणार नाही हे स्पष्ट करून विधीमंडळाच्या राजकारणातून आपली सुटका करून घेतली. ठाकरे सेना महाआघाडीमध्ये ६-७ जागांवर दावा करत असल्याचे सूत्र सांगतात. २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत महायुतीने २३५ जागा जिंकून भारी बहुमत मिळवले, मविआची अवस्था कमकुवत झाली. आता विधानपरिषदेत मविआने काँग्रेस, ठाकरे गट आणि शरद पवार गटात समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आहे. विरोधी पक्षनेतेपदावरूनही आघाडीत मतभेद दिसले. तरीही, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघात मविआ काही जागांवर चांगली लढत देऊ शकते, विशेषतः पुणे, ठाणे, नाशिकसारख्या भागांत. महायुतीला बहुसंख्य जागा (१४ प्लस) मिळण्याची दाट शक्यता आहे. भाजपची मजबूत संघटनात्मक ताकद आणि सत्तेचा फायदा निर्णायक ठरेल. अमरावती, सोलापूर, नागपूरसारख्या ठिकाणी प्रलोभनाच्या बातम्या येत असल्या तरी महायुतीचे पारडे जड आहे. त्यांना आव्हान देणारे टिकाव धरणे मुश्किल. मविआ २-४ जागांवर यश मिळवू शकते. ठाणे-पालघर, रायगड, पुणे विभागात चांगली लढत अपेक्षित. मात्र, आघाडीतील समन्वयाचा अभाव अडथळा ठरू शकतो. छोटे पक्ष/अपक्ष काही मतदारसंघात प्रभाव टाकू शकतात. विधानपरिषद निवडणूक महायुतीसाठी 'सत्ता कायम ठेवण्याची' आणि मविआसाठी 'पुनरुत्थानाची' संधी आहे. महायुतीत जागावाटपाचा तणाव लवकर सोडवला नाही तर काही जागांवर अंतर्गत उमेदवारी किंवा मतविभाजन होऊ शकते, ज्याचा फायदा मविआला मिळेल. शिंदे-फडणवीस यांच्यातील समन्वय हा महायुतीच्या यशाचा कळीचा मुद्दा राहील. ठाकरे सेनेने मविआला एकत्र ठेवले तर विरोधक काही जागा वाचवू शकतील. एकूणच, ही निवडणूक महाराष्ट्राच्या राजकारणातील 'सत्ताधारी एकता वि. विरोधकांच्या एकजूटी' ची परीक्षा आहे. निकालानंतर पुढची समीकरणे स्पष्ट होतील. महाराष्ट्राच्या राजकीय भविष्यात हे निकाल महत्त्वाचे ठरतील.

# महाराष्ट्राची लोकमाता : पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

महाराष्ट्राच्या इतिहासाला अनेक थोर संत, समाजसुधारक आणि आदर्श राज्यकर्त्यांचा गौरवशाली वारसा लाभला आहे. त्या तेजस्वी परंपरेतील एक अद्वितीय आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर. लोककल्याण, न्यायप्रियता, धर्मपरायणता आणि सक्षम प्रशासन यांचा सुंदर मिलाफ त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसून येतो. म्हणूनच इतिहासाने त्यांना 'लोकमाता' आणि 'पुण्यश्लोक' ही उपाधी बहाल केली.

अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी महाराष्ट्रातील चौंडी या गावात झाला. त्यांचे वडील माणकोजी शिंदे हे गावचे पाटील होते. त्या काळात मुलींना शिक्षण देण्याची प्रथा फारशी नव्हती; परंतु माणकोजी शिंदे यांनी अहिल्यादेवींना धार्मिक, नैतिक आणि व्यवहारज्ञानाचे शिक्षण दिले. बालपणापासूनच त्यांच्यामध्ये करुणा, परोपकार आणि नेतृत्वगुण दिसून येत होते. असे सांगितले जाते की, मराठा साम्राज्याचे पराक्रमी सरदार मल्हारराव होळकर यांनी एका मंदिरात लहान अहिल्यादेवींना भक्तिभावाने पूजा करताना पाहिले आणि त्यांच्या गुणांनी प्रभावित होऊन आपल्या पुत्र खंडेराव होळकर यांच्याशी त्यांचा विवाह घडवून आणला. विवाहानंतर त्या माळवा प्रांतातील होळकर घराण्यात आल्या. त्यांचे वैवाहिक जीवन इंदूर आणि महेश्वर परिसरात गेले. अहिल्यादेवींच्या आयुष्यात अनेक कठीण प्रसंग आले. पती खंडेराव यांचे युद्धात निधन झाले. त्यानंतर सासरे मल्हारराव होळकर यांचेही निधन झाले. पुढे पुत्र मालेराव यांचाही मृत्यू झाला. या मोठ्या दुःखातून सावरत त्यांनी राज्यकारभाराची धुरा स्वतःच्या खांद्यावर घेतली. त्या काळात स्त्रीने राज्यसत्ता चालवणे हे अत्यंत कठीण मानले जात होते; परंतु अहिल्यादेवींनी आपली बुद्धिमत्ता, धैर्य आणि प्रशासनकौशल्याने संपूर्ण माळवा प्रदेश सक्षमपणे सांभाळला.

सन १७६७ ते १७९५ या काळात त्यांनी राज्यकारभार केला. त्यांची राजधानी महेश्वर येथे होती. त्यांच्या प्रशासनात प्रजेच्या कल्याणाला सर्वोच्च प्राधान्य होते. त्या दररोज जनतेच्या तक्रारी ऐकत आणि त्वरित न्याय देत. गरीब, शेतकरी, व्यापारी, स्त्रिया आणि दुर्बल घटकांच्या संरक्षणासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.त्यांच्या न्यायप्रियतेविषयी अनेक कथा प्रसिद्ध आहेत. न्यायदान करताना त्यांनी कधीही पक्षपात केला नाही. स्वतःच्या नातलगांविरुद्धही त्यांनी न्यायाच्या तत्त्वांनुसार निर्णय दिले. त्यामुळे प्रजेमध्ये त्यांच्या विषयी अपार आदर निर्माण झाला. ''राज्यकर्त्याने प्रजेच्या सुखासाठी काम केले पाहिजे'' हा त्यांचा मूलमंत्र होता.

अहिल्यादेवींची ओळख केवळ एक सक्षम प्रशासक म्हणून नाही, तर लोककल्याणकारी आणि धर्मपरायण राज्यकर्ती म्हणूनही आहे. त्यांनी भारतभरातील अनेक मंदिरे, घाट, धर्मशाळा, विहिरी आणि यात्रेकरुंसाठी निवासस्थाने बांधली. उत्तर ते दक्षिण भारतापर्यंत त्यांच्या दानशूर कार्याचा ठसा दिसून येतो. लोकांना पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी, यात्रेकरुंना पाणवठा असा सर्वंकष विचार करुन त्यांनी विहिरी, बारवा, तलाव, कुंड, पाणपोया देशाच्या विविध भागात बांधल्या. ज्या काळात प्रदेशाप्रदेशात विभागणी होती त्या काळात 'बंधुता' पेरण्याचे काम तत्कालीन भारतात त्यांनी केले. त्यांनी काशी विश्वनाथ मंदिराच्या पुनर्बांधणीसाठी मोठे योगदान दिले. तसेच सोमनाथ, गया, उज्जैन, नाशिक, द्वारका, रामेश्वरम, अयोध्या आणि हरिद्वार यांसारख्या तीर्थक्षेत्रांमध्ये घाट, मंदिरे आणि धर्मशाळा उभारल्या. वाराणसीतील अनेक घाट आजही त्यांच्या कार्याची साक्ष देतात. राज्यात व्यापार आणि शेतीला चालना मिळाली. रस्ते, पाणीपुरवठा, बाजारपेठा आणि सुरक्षाव्यवस्था यावर त्यांनी विशेष भर दिला. त्यामुळे माळवा प्रदेश आर्थिकदृष्ट्या समृद्ध झाला. त्यांच्या प्रशासनात भ्रष्टाचाराला थारा नव्हता. अहिल्यादेवींचा करारीपणा आणि धाडसी नेतृत्व अनेक प्रसंगांत दिसून आले. युद्धजन्य परिस्थितीत त्यांनी स्वतः सैन्याचे नेतृत्व केले. शत्रूंना पराभूत करताना त्यांनी धैर्य आणि




रणनीतीचे उत्कृष्ट उदाहरण घालून दिले. स्त्री नेतृत्वाविषयी असलेल्या समाजातील मर्यादित कल्पना त्यांनी आपल्या कार्यातून मोडून काढल्या.

भारतीय इतिहासात त्यांच्या समकालीन अनेक प्रभावी महिला होऊन गेल्या. परंतु लोककल्याणकारी राज्यव्यवस्था आणि धार्मिक-सामाजिक कार्य यांच्या समन्वयामुळे अहिल्यादेवींचे स्थान विशेष मानले जाते.

अहिल्यादेवींना ''पुण्यश्लोक'' ही उपाधी देण्यात आली कारण त्यांनी आपल्या प्रजेला दुःखातून मुक्त करुन सुखी करण्याचा प्रयत्न केला. लोकांच्या कल्याणासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या राज्यकर्त्यालाच ''पुण्यश्लोक'' म्हटले जाते. त्यांच्या कार्यामुळेच त्या आजही लोकांच्या मनात ''लोकमाता'' म्हणून जिवंत आहेत.

महाराष्ट्र शासनानेही त्यांच्या कार्याचा गौरव विविध प्रकारे केला आहे. त्यांच्या २९८ व्या जयंतीनिमित्त अहमदनगर जिल्ह्याचे नामकरण ''अहिल्यानगर'' असे करण्यात आले. १३ मार्च २०२४ रोजी मंत्रिमंडळ बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. त्यांच्या त्रिशताब्दी जन्मवर्षानिमित्त चोंडी येथे मंत्रिमंडळाची विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. चौंडी, तालुका जामखेड, जिल्हा अहिल्यानगर येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीस्थळाच्या जतन संवर्धनासाठी कोट्यवधीचा निधी दिला आहे. केंद्र शासनाने त्यांच्या ३०० व्या जयंतीला विशेष डाक तिकीट काढले. राज्य शासनाने पुण्यश्लोक ३०० हा विशेष लोगो प्रकाशित केला आहे.

आज महाराष्ट्र शासन त्यांच्या आदर्श राज्यकारभाराच्या तत्त्वांनुसार सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी विविध योजना राबवत आहे. महिलांचे सक्षमीकरण, उद्योग, शिक्षण आणि स्वावलंबन यासाठी अनेक उपक्रम सुरु करण्यात आले आहेत. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना- ''पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर महिला स्टार्टअप योजना'' ही महाराष्ट्रातील महिलांना उद्योग आणि उद्योजकतेसाठी प्रोत्साहन देणारी योजना आहे. या योजनेचा उद्देश महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे आणि नवीन व्यवसाय उभारण्यासाठी मदत करणे हा आहे. या योजनेअंतर्गत महिलांना: स्टार्टअप व्यवसायासाठी मार्गदर्शन, प्रशिक्षण व कौशल्यविकास, आर्थिक सहाय्य व कर्ज सुविधा, उद्योग उभारणीसाठी सल्ला, नवउद्योजकांना प्रोत्साहन अशा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जातात. ग्रामीण आणि शहरी भागातील महिलांना आत्मनिर्भर बनविण्याचा या योजनेचा मुख्य हेतू आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे जीवन हे न्याय, सेवा, धर्मपरायणता आणि लोककल्याण यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांचा आदर्श राज्यकारभार आजही प्रशासनासाठी मार्गदर्शक मानला जातो. लोकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणारी त्यांची विचारसरणी आजच्या काळातही तितकीच महत्त्वपूर्ण आणि प्रेरणादायी आहे.

-----------------

**प्रवीण टाके**
उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,कोल्हापूर
९७०२८५८७७७

# प्रजाजनासाठी धडपडणाऱ्या अहिल्यादेवी : लोककल्याणकारी राज्यकारभाराचा आदर्श

भारतीय इतिहासाच्या विशाल पटावर अनेक राजे, महाराजे, सम्राट आणि राज्यकर्ते होऊन गेले. काहींनी युद्धे जिंकून इतिहास घडविला, तर काहींनी आपल्या पराक्रमाने साम्राज्य विस्तारले. परंतु जनतेच्या मनावर राज्य करणारे आणि प्रजेला आपल्या कुटुंबाप्रमाणे जपणारे राज्यकर्ते फार थोडे होऊन गेले. अशा मोजक्या लोककल्याणकारी राज्यकर्त्यांमध्ये पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले गेले आहे. सत्ता, संपत्ती आणि वैभवाच्या शिखरावर असूनही ज्यांनी जनतेच्या सुख-दुःखाला आपल्या जीवनाचे ध्येय मानले, अशा अहिल्यादेवी आजही लोकस्मृतीत 'मातोश्री' म्हणून जिवंत आहेत. अहिल्यादेवींचे जीवन म्हणजे संघर्ष, त्याग, दूरदृष्टी आणि लोककल्याण यांचे अद्वितीय उदाहरण होय. चौंडी या छोट्याशा गावात जन्मलेल्या या कन्येने पुढे माळवा प्रदेशाच्या राज्यकारभाराची धुरा समर्थपणे सांभाळली. पती खंडेराव होळकर यांचे युद्धात निधन झाल्यानंतर तत्कालीन समाजरचनेनुसार त्यांच्यावर सती जाण्याचा दबाव होता. परंतु सासरे मल्हारराव होळकर यांनी त्यांना सती जाण्यापासून परावृत्त केले. हा निर्णय केवळ एका स्त्रीचे जीवन वाचवणारा नव्हता, तर भारतीय इतिहासाला एक आदर्श शासिका देणारा ठरला.

मल्हारराव होळकर यांच्या मार्गदर्शनाखाली अहिल्यादेवींनी प्रशासन, अर्थकारण, सैनिकी व्यवस्थापन आणि न्यायदान यांचे बारकावे आत्मसात केले. त्यामुळे सासरे आणि पुत्राच्या निधनानंतर राज्यावर संकटाचे ढग दाटून आले असतानाही त्यांनी धैर्याने नेतृत्व स्वीकारले. अनेक सरदार आणि राजकीय प्रतिस्पर्ध्यांचा विरोध झुगारून त्यांनी माळव्याच्या गादीवर बसण्याचा अधिकार मिळवला. त्या काळात स्त्रीने राज्यकारभार करणे हेच अनेकांना मान्य नव्हते; मात्र आपल्या बुद्धिमत्ता, कार्यक्षमता आणि धाडसाच्या बळावर त्यांनी सर्व विरोधकांना शांत केले. अहिल्यादेवींच्या राज्यकारभारातील सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे त्यांची प्रजावत्सलता. आजच्या लोकशाहीतही अनेकदा सामान्य नागरिकाला सत्तेच्या दारापर्यंत पोहोचणे कठीण जाते. परंतु अहिल्यादेवी दररोज खुला दरबार भरवत असत. कोणताही प्रजाजन थेट त्यांच्यापर्यंत आपली व्यथा मांडू शकत असे. न्याय मिळवण्यासाठी त्याला दलालांची किंवा शिफारशींची गरज नव्हती. न्याय हा त्यांच्या राज्याचा आत्मा होता.



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर - २९८ वा जयंती उत्सव

त्यांच्या न्यायप्रियतेच्या अनेक कथा आजही लोकपरंपरेत सांगितल्या जातात. सुभेदार तुकोजीराव होळकर यांच्या मुलाने प्रजेला त्रास दिला म्हणून त्यालाही शिक्षा देण्यात आली. सत्ता, नातेसंबंध किंवा पद यापेक्षा न्याय मोठा आहे, हा संदेश त्यांनी आपल्या कृतीतून दिला. आजच्या काळात सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या लोकांवर कारवाई करण्यास प्रशासन अनेकदा टाळाटाळ करते. अशा वेळी अहिल्यादेवींची न्यायनिष्ठा अधिकच प्रेरणादायी वाटते. अहिल्यादेवींनी राज्यकारभार केवळ महसूल गोळा करण्यापुरता मर्यादित ठेवला नाही. त्यांनी शेतकरी, व्यापारी, कारागीर आणि सामान्य जनतेच्या विकासाला प्राधान्य दिले. ''शेतकरी सुखी तर राज्य सुखी'' हा विचार त्यांनी प्रत्यक्षात उतरविला. शेतकऱ्यांवरील अन्यायकारक कर कमी केले. तलाव, विहिरी आणि पाणीपुरवठ्याच्या सुविधा निर्माण केल्या. दुष्काळाशी मुकाबला करण्यासाठी जलसंधारणाची कामे केली. ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा मजबूत करण्यासाठी गोपालनाला प्रोत्साहन दिले.

त्यांच्या काळात व्यापार आणि उद्योगधंद्यांनाही उत्तेजन मिळाले. महेश्वर हे शहर त्यांनी केवळ राजधानी म्हणून विकसित केले नाही, तर ते वस्त्रोद्योग, संस्कृती आणि विद्वत्तेचे केंद्र बनवले. आज प्रसिद्ध असलेल्या महेश्वरी साड्यांच्या परंपरेला चालना देण्याचे श्रेयही त्यांनाच जाते. रोजगारनिर्मिती आणि स्थानिक अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी त्यांनी केलेले प्रयत्न आधुनिक आर्थिक धोरणांनाही मार्गदर्शक ठरावेत असे आहेत. अहिल्यादेवींची दूरदृष्टी केवळ अर्थकारणापुरती मर्यादित नव्हती. सामाजिक सुधारणांच्या बाबतीतही त्या आपल्या काळाच्या कितीतरी पुढे होत्या. सतीप्रथेच्या विरोधात त्यांनी लोकजागृती केली. धर्मग्रंथांचा आधार घेऊन सतीप्रथेला कोणताही शास्त्रीय आधार नसल्याचे लोकांना पटवून दिले. विधवांच्या हक्कांचे संरक्षण केले. दत्तक घेण्याच्या प्रक्रियेत अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांना फटकारले. स्त्रियांच्या सन्मानासाठी आणि स्वावलंबनासाठी त्यांनी अनेक निर्णय घेतले.

आज स्त्रीसक्षमीकरणाची चर्चा मोठ्या प्रमाणात होत असली तरी अठराव्या शतकात एका स्त्रीने इतक्या व्यापक सामाजिक सुधारणा करणे ही अभूतपूर्व बाब होती. त्यामुळेच अहिल्यादेवी या केवळ राजमाता नव्हत्या, तर त्या सामाजिक परिवर्तनाच्या अग्रदूत होत्या. ज्ञान, संस्कृती आणि शिक्षण यांच्याबाबतही त्यांची भूमिका अत्यंत सकारात्मक होती. अनेक विद्वान, पंडित, शास्त्री, कीर्तनकार, वैद्य आणि अभ्यासकांना त्यांनी आश्रय दिला. हस्तलिखित ग्रंथांचे जतन आणि निर्मिती यासाठी मोठ्या प्रमाणात आर्थिक मदत केली. शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी शाळा सुरू केल्या. ज्ञान ही समाजाच्या प्रगतीची खरी शक्ती आहे, याची त्यांना पूर्ण जाणीव होती.

धर्माविषयी त्यांची श्रद्धा खोल होती; मात्र ती अंधश्रद्धा नव्हती. त्यांनी भारतातील अनेक तीर्थक्षेत्रांचा विकास केला. काशी, सोमनाथ, द्वारका, रामेश्वर, हरिद्वार, उज्जैन, अयोध्या यांसारख्या ठिकाणी घाट, मंदिरे, धर्मशाळा आणि यात्रेकरूंसाठी सुविधा उभारल्या. परंतु धर्माच्या नावाखाली भेदभाव किंवा दडपशाही त्यांनी कधीच स्वीकारली नाही. त्यांचा धर्म म्हणजे लोकसेवा आणि मानवतेची उपासना होता. अहिल्यादेवींच्या व्यक्तिमत्त्वातील आणखी एक उल्लेखनीय पैलू म्हणजे त्यांची राजकीय दूरदृष्टी. ब्रिटिशांच्या वाढत्या प्रभावाविषयी त्यांनी वेळेआधीच इशारा दिला होता. पेशव्यांना लिहिलेल्या पत्रात त्यांनी इंग्रजांशी संबंध ठेवताना सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला. अस्वलाच्या मिठीची उपमा देत त्यांनी इंग्रजांच्या विस्तारवादी धोरणाचे अचूक विश्लेषण केले. पुढील इतिहास पाहता त्यांच्या या निरीक्षणाची प्रगल्भता अधोरेखित होते.

समाजातील वंचित आणि आदिवासी घटकांबद्दलही त्यांची भूमिका संवेदनशील होती. भिल्ल आणि गोंड जमातींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. रोजगार, जमीन आणि सैन्यात स्थान देऊन त्यांना सन्मानाचे जीवन जगण्याची संधी उपलब्ध करून दिली. गुन्हेगारीकडे वळलेल्या लोकांना शिक्षा देतानाच त्यांचे पुनर्वसन करण्याची मानवी दृष्टी त्यांनी दाखवून दिली. आजच्या काळात शासन आणि प्रशासन यांच्यावर अनेकदा लोकांपासून दूर असल्याचा आरोप होतो. विकासाच्या नावाखाली सामान्य माणसाच्या समस्या दुर्लक्षित होतात. अशा वेळी अहिल्यादेवींचे शासन मॉडेल अधिक महत्त्वाचे ठरते. त्यांनी विकास, न्याय, शिक्षण, सामाजिक समता, धार्मिक सहिष्णुता आणि लोककल्याण यांचा सुंदर समन्वय साधला होता. म्हणूनच त्यांचा तीस वर्षांचा राज्यकाल हा माळव्याच्या इतिहासातील सुवर्णकाळ मानला जातो.

अहिल्यादेवींच्या कार्याची दखल केवळ भारतातच नव्हे तर परदेशी इतिहासकारांनीही घेतली. अनेक इंग्रजी लेखकांनी त्यांची तुलना रशियाच्या कॅथरीन द ग्रेट आणि इंग्लंडच्या राणी एलिझाबेथ यांच्याशी केली आहे. परंतु वस्तुतः अहिल्यादेवींचे व्यक्तिमत्त्व या सर्व तुलनांच्या पलीकडचे आहे. कारण त्यांची महानता केवळ राज्यकारभारात नव्हती, तर जनतेच्या हृदयात निर्माण झालेल्या विश्वासात होती. आजही इंदूर विमानतळ, देवी अहिल्या विश्वविद्यालय, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांसारख्या संस्थांमधून त्यांच्या कार्याची आठवण जिवंत ठेवली जाते. मात्र त्यांना खरी आदरांजली म्हणजे त्यांच्या विचारांचे अनुकरण होय. जनतेच्या कल्याणाला प्राधान्य देणारे प्रशासन, न्यायाला सर्वोच्च स्थान, स्त्री-सन्मान, शिक्षणाचा प्रसार आणि सर्वसमावेशक विकास यांची अंमलबजावणी करण्यातच त्यांचे स्मरण सार्थ ठरेल.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर या केवळ इतिहासातील एक महान शासिका नव्हत्या; त्या लोककल्याणकारी राज्यकारभाराचा जिवंत आदर्श होत्या. सत्तेला सेवेत रूपांतरित करणाऱ्या, न्यायाला धर्म मानणाऱ्या आणि जनतेच्या सुखात स्वतःचे सुख शोधणाऱ्या या मातोश्रींचे जीवन आजच्या राज्यकर्त्यांसाठी दीपस्तंभ आहे. म्हणूनच इतिहासाच्या पानांवर त्यांचे नाव केवळ एका राणीचे नसून, ''रयतेच्या सुखासाठी आयुष्य वेचणाऱ्या लोकमातेचे'' म्हणून सदैव अजरामर राहील. सत्ता ही जनसेवेसाठी असते, वैभवासाठी नव्हे; हे आपल्या कर्तृत्वातून जगाला दाखवून देणाऱ्या लोकमाता अहिल्यादेवींना कोटी कोटी प्रणाम. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर जयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!



**प्रवीण बागडे**
**मो.क्र. ९९२३६२०९१९**
**नागपूर**

# निवेदन देण्यासाठी आलेल्या रसूल बाबांचा हृदयविकाराने मृत्यू

## खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या कडून कुटुंबाला ५ लाखांची मदत

**केज/प्रतिनिधी :** शिवसेनेचे संसदीय गटनेते व खासदार श्रीकांत शिंदे हे शिवसंवाद दौऱ्यानिमित्त बीड जिल्ह्यातील केज येथे आले असताना एक दुःखद घटना घडली. केज येथील रसूल गफुर सय्यद उर्फ रसूल बाबा (वय ६५) यांचे बैठकीच्या ठिकाणी अचानक हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले.

रसूल बाबा हे व्यवसायाने भाजी विक्रेते होते. मुलाच्या अपघाती निधनानंतर कुटुंबाला आर्थिक मदत मिळावी, यासाठी ते निवेदन देण्यासाठी कार्यक्रमस्थळी आले होते. याचदरम्यान त्यांना अचानक अस्वस्थ वाटू लागले आणि हृदयविकाराचा तीव्र झटका आला. उपस्थितांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचारापूर्वीच त्यांची प्राणज्योत मालवली.

घटनेची माहिती मिळताच खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी तत्काळ रसूल बाबा यांच्या केज येथील निवासस्थानी जाऊन कुटुंबीयांची भेट घेतली. यावेळी त्यांनी दुःख व्यक्त करत कुटुंबीयांचे सांत्वन केले व या कठीण प्रसंगी शिवसेना त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी असल्याचा विश्वास दिला. रसूल बाबा यांनी आयुष्यभर कष्ट करून आपल्या कुटुंबाचा सांभाळ केला. त्यांच्या अकस्मात निधनामुळे कुटुंबावर मोठे संकट कोसळले आहे.

या पार्श्वभूमीवर कुटुंबाला आर्थिक आधार मिळावा या उद्देशाने खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी शिवसेना पक्षातर्फे पाच लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर करून सुपूर्द केली. या मदतीमुळे दुःखात असलेल्या रसूल बाबा यांच्या कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला असून खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या संवेदनशीलतेचे नागरिकांकडून समाधान व्यक्त होत आहे.



# विविध वृत्त...

### धर्माळा येथे विज्ञानाधारित शेती व्यवस्थापनावर मार्गदर्शन शिबीर

**केज/प्रतिनिधी :** तालुक्यातील धर्माळा येथे अंबाजोगाई येथील दीनदयाळ शोध संस्था कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने शनिवारी ( दि. ३० ) विज्ञानाधारित अन्नद्रव्य व निविष्ठा व्यवस्थापन जनजागरण अभियानांतर्गत शेतकरी मार्गदर्शन शिबीर घेण्यात आले.

यावेळी विषय तज्ज्ञ कृष्णा कर्डिले यांनी कमी पावसाच्या परिस्थितीत पीक नियोजन, जलसंधारण, जैविक खतांचा वापर, माती परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन व तण नियंत्रण याबाबत मार्गदर्शन केले. व एल निनोचा शेतीवर होणारा परिणाम आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती दिली. तालुका कृषी अधिकारी सागर पठाडे यांनी शून्य मशागत तंत्रज्ञान व कृषी विभागाच्या विविध योजनांची शेतकऱ्यांना माहिती दिली. या शिबिरात शेतकऱ्यांच्या पीक व्यवस्थापन, खत टंचाई व कीड-रोग नियंत्रणासंदर्भातील शेतकऱ्यांनी विचारलेल्या प्रश्नांचे निरसन करण्यात आले. शास्त्राधारित शेतीचा अवलंब करून शेतकऱ्यांनी उत्पादनवाढ व खर्चात बचत करण्याचे आवाहन यावेळी मान्यवरांनी केले.

### झोपलेल्या महिलेच्या घरात घुसून विनयभंग, तिघां विरुद्ध गुन्हा नोंद

**केज/प्रतिनिधी :** तालुक्यातील एका खेडेगावात घरात घुसून १९ वर्षीय विवाहित महिलेचा विनयभंग केल्याचा व या प्रकाराबाबत जाब विचारणाऱ्या तिच्या सासऱ्यास मारहाण केल्याची घटना घडली आसून,या प्रकरणी पिडीत महिलेच्या फिर्यादीवरून शुक्रवारी केज पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.केज तालुक्यातील एका खेडेगावात राहणाऱ्या पीडित महिलेचा पती गुरूवारी ( दि २८ ) खाजगी कामानिमित्त नांदूरघाट येथे गेला होता. त्या रात्री महिला घरात एकटीच झोपली होती, तर तिची सासू घराबाहेर अंगणात झोपली होती. रात्री ११ वाजण्याच्या दरम्यान सचिन केशव ठोंबरे याने घरात प्रवेश करून विवाहित महिलेचा विनयभंग केला. यावेळी महिलेने आरडाओरडा केल्यानंतर तिची सासू जागी होऊन घरात आली. तिने संबंधितास जाब विचारला असता त्याने तिला ढकलून शिवीगाळ केली आणि तेथून पळ काढला. यानंतर रात्री उशिरा पती व सासरे घरी आल्यानंतर महिलेने त्यांना घडलेला प्रकार सांगितला. दुसऱ्या दिवशी सासऱ्याने याबाबत जाब विचारला असता सर्जेराव काशीनाथ ठोंबरे याने त्यांना पकडून ठेवले, तर सचिन केशव ठोंबरे आणि सुमित संतोष ठोंबरे यांनी त्यांना काठीने मारहाण केली.

पीडित महिलेच्या तक्रारीवरून शुक्रवारी (दि. २९ ) सचिन केशव ठोंबरे, सुमित संतोष ठोंबरे आणि सर्जेराव काशीनाथ ठोंबरे यांच्याविरुद्ध केज पोलिस ठाण्यात विविध कलमांन्वये विनयभंगाचा गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार उमेश आघाव हे पुढील तपास करीत आहेत.

### विशेष मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन

**छत्रपती संभाजी नगर /प्रतिनिधी :** आपण सर्वांना याद्वारे कळविण्यात येत आहे की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने ३१ मे २०२६, रविवार ला दुपारी २:३० वाजता, संस्थेचे जनसंपर्क कार्यालय, ४, साकेत नगर, भावसिंगपुरा रोड, छत्रपती संभाजीनगर येथे ''राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले यांनी ''गुलामगिरी'' हे पुस्तक अमेरिकेतील निग्रोंना का अर्पण केली असावी? एक विचार मंथन. (संदर्भ : १ जून १८७३, गुलामगिरी या ग्रंथाचा १५३ वा वर्धापन दिन)'' या ऐतिहासिक प्रासंगिक विषयावर गुलामगिरी या ग्रंथ प्रकाशनाच्या १५३ व्या वर्धापनदिनानिमित्त सामाजिक जनजागृतीच्या अनुषंगाने १७३ व्या मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेला जिल्हा व सत्र न्यायालययाचे ॲड. राहूल गायकवाड हे उद्घाटनपर मार्गदर्शन करणार आहेत. जिल्हा सत्र न्यायालयाचे ॲड. धनेश गवळी हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत. ही कार्यशाळा फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फॉउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न होणार आहे. या कार्यशाळेत नोंदणीकृत सर्व प्रतिनिधींना आपले मत व्यक्त करण्याची संधी दिली जाणार आहे. करिता ९९६०३४६०५४, ८८०६३८४११५, ८९८३०८२१२८, ९८२२७७१९१९, ८६०५४०२२१४. या क्रमांकावर नोंदणी करावी. तरी आपले मत पटवून देण्यासाठी व इतरांची मते समजून घेण्यासाठी आपण मित्र परिवारासह उपस्थित राहावे. असे फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनच्या वतीने कळविण्यात आले आहे.

### यूपी, बिहारमध्ये वादळ आणि पावसामुळे ४८ जणांचा मृत्यू; इनोव्हा ट्रॅक्टरसह 10 वाहने वाहून गेली

सहारनपूरः देशातील उष्णतेच्या लाटेच्या पार्श्वभूमीवर, १५ हून अधिक राज्यांमध्ये मान्सूनपूर्व पावसाचा इशारा देण्यात आला आहे. बिहारमध्ये, गेल्या २४ तासांत मेघगर्जना आणि वीज कोसळल्याने १७ जणांचा मृत्यू झाला. पाटणामध्ये पावसामुळे चार विमानांचे मार्ग बदलण्यात आले आणि १८ विमानांना विलंब झाला, ज्यामुळे ५०० हून अधिक प्रवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागला. राज्यातील २५ जिल्ह्यांमध्ये आज पावसाची शक्यता आहे. उत्तर प्रदेशमध्ये, गेल्या २४ तासांत मेघगर्जनेमुळे ३१ जणांचा मृत्यू झाला. सहारनपूरमध्ये मुसळधार पावसामुळे डोंगरावरून वेगाने वाहणाऱ्या पाण्याने इनोव्हा ट्रॅक्टरसह १० वाहने वाहून नेली.

## 'नशामुक्त महाराष्ट्र अभियाना'त लोकप्रतिनिधींनी सक्रिय सहभाग नोंदवावा

### पालकमंत्री ॲड.आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांचे आवाहन




**मुंबई/प्रतिनिधी :** येत्या २५ जूनपासून राज्यभर राबविण्यात येणाऱ्या 'नशामुक्त महाराष्ट्र अभियान' मध्ये सर्व लोकप्रतिनिधी, शैक्षणिक संस्था आणि सामाजिक संघटनांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन मुंबई उपनगरचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

मुंबई उपनगर जिल्हा नियोजन समितीची बैठक पालकमंत्री ॲड.आशिष शेलार आणि सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे पार पडली. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत सुमारे १६० मान्यवर ऑनलाईन उपस्थित होते. तसेच बैठकीस महापौर रितू तावडे, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार तसेच लोकप्रतिनिधी, पोलीस, महापालिका, म्हाडा, एमआयडीसी, एमएमआरडीए आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी सहभागी झाले होते.

बैठकीत लोकप्रतिनिधींनी सार्वजनिक उद्याने, मैदाने, सार्वजनिक स्वच्छतागृहे तसेच काही ठिकाणी अमली पदार्थांच्या वापरासंदर्भातील तक्रारी आणि सूचना मांडल्या. या सर्व बाबींची गांभीर्याने दखल घेत संबंधित यंत्रणांनी प्रभावी कारवाई करावी, असे निर्देश पालकमंत्री ॲड. शेलार यांनी दिले. नागरिकांसाठी सुरक्षित आणि स्वच्छ वातावरण निर्माण करण्यासाठी प्रशासनाने समन्वयाने काम करावे, असेही त्यांनी सांगितले.

सहपालकमंत्री मंगलप्रभात लोढा यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या 'नशामुक्त महाराष्ट्र अभियान'अंतर्गत शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक स्तरांवर व्यापक जनजागृती केली जाणार आहे. युवकांना व्यसनमुक्त जीवनशैलीकडे प्रेरित करण्यासाठी विविध उपक्रम राबविले जातील. या अभियानात सर्व लोकप्रतिनिधींनी सहभागी होऊन जनजागृतीस हातभार लावावा, असे आवाहन त्यांनी केले.

बैठकीत किनारी भागांतील तिवरांच्या अनधिकृत तोडीबाबतही लोकप्रतिनिधींनी लक्ष वेधले. या संदर्भात प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल, असे आश्वासन पालकमंत्री ॲड. शेलार यांनी दिले.

पश्चिम द्रुतगती मार्गावरील वाहतूक कोंडीच्या प्रश्नावरही बैठकीत चर्चा झाली. वाहतूक व्यवस्थापन अधिक सक्षम करण्यासाठी आवश्यक उपाययोजना राबविण्याबरोबरच वाहतूक पोलिसांनी विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना पालकमंत्री ॲड.शेलार यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या.

मुंबई उपनगर जिल्ह्यात सुरक्षित, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक परिसर निर्माण करण्यासाठी प्रशासन, लोकप्रतिनिधी आणि नागरिक यांच्या सहभागातून प्रभावी कृती आराखडा राबविण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले.

### चार धाम यात्रेला तुफान गर्दी, जोशीमठजवळ २५-३० किलोमीटरपर्यंत वाहतूक कोंडी, यात्रेकरू हैराण

चमोली(उत्तराखंड) : उत्तराखंडमध्ये सध्या चारधाम यात्रा सुरू आहे. चारधाम यात्रेसाठी मोठ्या संख्येने भाविक येत आहेत. याचा परिणाम रस्त्यांवरही जाणवत आहे. चारधाम यात्रेच्या मार्गावर झालेल्या भीषण वाहतूक कोंडीची छायाचित्रे समोर येत आहेत. वाहतूक कोंडीचे फोटो आणि व्हिडिओ व्हायरल - केदारनाथ आणि बद्रीनाथ महामार्गावर दररोज वाहतूक कोंडी होत असून, त्यामुळे रहिवाशांना गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. वाहतूक कोंडीचे ताजे व्हिडिओ जोशीमठमधून समोर आले आहेत. या वाहतूक कोंडीचे फोटो आणि व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत.

प्रचंड वाहतूक कोंडी - बद्रीनाथ धामासोबतच हेमकुंड साहिब यात्राही सुरू झाली आहे. या मार्गावरील वाहतूक कोंडीमुळे यात्रेकरूंच्या अडचणी अधिकच वाढल्या आहेत. गेल्या चार दिवसांपासून जोशीमठ ते मारवाडी दरम्यान प्रचंड वाहतूक कोंडी झाली आहे. यामुळे चारधाम यात्रेकरूंसोबतच हेमकुंड साहिबला जाणारे यात्रेकरूही रस्त्यात तासंतास अडकून पडले होते.

### प्रकरण मिटवून घे, नाहीतर तुला आणि धनंजय देशमुखला मारून टाकू, संतोष देशमुख प्रकरणातील साक्षीदाराला धमकी

**बीड/प्रतिनिधी :**बीडमध्ये गुन्हेगारांनी उच्छाद मांडला आहे. त्यामुळे बीडचं बिहार झालेय का असे उगाच म्हटले जात नाही. अशातच मस्साजोगचे माजी सरपंच संतोष देशमुख प्रकरणातून एक धक्कादायक बातमी समोर आली आहे. या प्रकरणातील साक्षीदाराला जीवे ठार मारण्याची धमकी देण्यात आली आहे. साक्ष दिली तर तुला आणि धनंजय देशमुख यांना ठार मारू, अशी धमकीचे दिल्याचे समोर आले आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संतोष देशमुख हत्या प्रकरणातील साक्षीदार दादा खिंडकर यांना या प्रकरणामध्ये साक्ष न देण्यासाठी आणि हे प्रकरण मिटवून घेण्यासाठी त्याच्या सख्ख्या लहान भावानेच जीवे मारण्याची धमकी दिली आहे. याप्रकरणी बीड शहरातील शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मयत सरपंच संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांचा साडू दादा खिंडकर हा संतोष देशमुख हत्या प्रकरणात कायदेशीर प्रक्रियेत सक्रिय आहे. दादा खिंडकर हा आपल्या घरी असताना, त्याचा लहान भाऊ समाधान खिंडकर हा त्या ठिकाणी आला. त्याने जुन्या वादाची कुरापत काढत दादा खिंडकरला थेट बजावलं की, ''तू धनंजय देशमुख यांच्यासोबत राहू नकोस आणि संतोष देशमुख प्रकरणात साक्ष देऊ नकोस. ते प्रकरण मिटवून घ्यायला सांग. त्यावर दादा खिंडकरने, तुला याच्याशी काय करायचं आहे? तू तुझे काम कर, असं उत्तर दिलं. याचा राग मनात धरून लहान भाऊ समाधान खिंडकर याने दादा खिंडकरला शिवीगाळ केली.

या प्रकारानंतर दादा खिंडकरने थेट पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी तातडीने दखल घेत अदखलपात्र गुन्ह्याची नोंद केली आहे. तक्रारदार दादा खिंडकर आणि आरोपी समाधान खिंडकर या दोन्ही भावांमध्ये गेल्या अनेक दिवसांपासून कौटुंबिक आणि इतर कारणांवरून वाद सुरू आहेत. या प्रकरणी आता शिवाजीनगर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहे.

## जनगणनेत अवगत भाषेच्या रकान्यात भाषा पाली लिहिणे म्हणजे पंचशीलांच्यां चौथ्या शीलेचे व सत्य पारमितेचे उल्लंघन करणे होय!

भारतीय बौध्द महासभेचे दिनांक ०४-०३-२०२६ चे आवाहन वाचण्यात आले. हेच आवाहन महासभेने जनगणना सुरू होण्यापूर्वीच २०२० मध्ये महासभेचे एकमेव सल्लागार अच्युत भोईटे अनुसूचित जात क्रमांक ११ चांभार यांच्या अमुल्य सल्ल्यानुसार महासभेने धर्माच्या रकान्यात बौध्द व अनुसूचित जात रकान्यात महार व अवगत भाषा पाली असे जनगणनेत लिहावे. बौध्दजनास केलेले होते.भारतीय बौध्द महासभेची दिनदर्शिका धम्मयाममध्ये २०२१ पासून २०२६ पर्यंत ह्याच आशयाची तळटीप टाकलेली आहे. जनगणनेतील धर्म व जात ह्या रकान्यात काय लिहावे? ह्याबाबत उलटसुलट चर्चा सुरू आहे. परंतु, ह्या आवाहनाच्या निमित्ताने एका गंभीर गोष्टीकडे मी बौध्दजनांचे लक्ष वेधू इच्छितो.पाली भाषेला सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.आपण सर्वजन सूत्रपठन,विधी संस्कार सर्व काही पाली भाषेत संपन्न करीत असतो.म्हणजे आपणास पाली भाषा अवगत आहे. म्हणून पाली भाषेच्या संवर्धनासाठी,आपण सर्वांनी अवगत भाषा या रकान्यात येणाऱ्या भाषांसोबत पाली भाषा अवश्य लिहावी. पंचशीलांतील दुसऱ्याच शीलात तथागत भगवान बुध्द म्हणतात...



मुसावादा वेरमणी सिक्खापदं समादियामी अर्थ: मी खोटे बोलण्यापासून (असत्य भाषण) अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते. भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ अन्वये, न्यायालयात खोटे बोलणेज्याला शपथभंग किंवा खोटी साक्ष देणे म्हणून ओळखले जातेहा कलम २२७-२२९ अंतर्गत एक गंभीर गुन्हा आहे. न्यायालयीन कार्यवाहीत हेतुपुरस्सर खोटी साक्ष देणे किंवा खोटी साक्ष तयार करणे यासाठी दंडासह सात वर्षांपर्यंतच्या तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकते, तर इतर परिस्थितीत खोटी साक्ष दिल्यास तीन वर्षांपर्यंतच्या शिक्षेची तरतूद आहे. आपण मराठी,हिंदी व इंग्रजी भाषेतील मजकूर वाचू शकतो,त्या भाषेत मजकूर लिहू शकतो ह्या तीन भाषा बोलू शकतो ह्याचा अर्थ असा होतो की,ह्या भाषा आपणास अवगत आहेत.( , ) तथापि, पाली भाषेला सरकारने अभिजात भाषेचा दर्जा दिला आहे.आपण सर्वजन सूत्रपठन, विधी संस्कार सर्व काही पाली भाषेत संपन्न करीत असतो. म्हणजे आपणास पाली भाषा अवगत आहे. असे म्हणणे सर्वथा चूक आहे.कारण,आपण पाली भाषेतील शिलालेख वाचू शकत नाही.आपण आपले नाव व पत्ता पाली भाषेत लिहू शकत नाही. मग,आपण बौध्दजन असे कसे काय म्हणू शकतो की, मला पाली भाषा अवगत आहे. असे म्हणणे व सांगणे म्हणजे उघडपणे पंचशील तत्त्वांचा अवमान करणे होय. भारतीय महासभेच्या राष्ट्रीय/प्रदेश/ मुंबई स्तरांवरील प्रमुख पदाधिकाऱ्यांना तरी पाली भाषेतील शिलालेख वाचता येतात का? एखाद्या पदाधिकाऱ्याने पाली भाषेत एखादे पुस्तक लिहिलेले आहे काय? एखाद्या पदाधिकाऱ्याने पाली भाषेत भाषण दिलेले आहे का? मग कशाच्या आधारावर महासभा असे आवाहन करते की,अवगत भाषेच्या रकान्यात पाली भाषा लिहा म्हणून??? माझ्या मते अशी खोटी माहिती देणे कायद्याने गुन्हा तर आहेच शिवाय पंचशीलांच्या चौथ्या शीलेचे व सत्य पारमितेचे उल्लंघन आहे. ''मुसावादावेरमणीसिक्खापदंसमादियामी'' अर्थ: मी खोटे बोलण्यापासून (असत्य भाषण) अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतो/करते. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या बावीस प्रतिज्ञांतील बारावी प्रतिज्ञा १२.मी बुद्धांनी सांगितलेल्या परमितांचे पालन करीन. सत्य पारमिता (सत्य) हा बौद्ध धर्मातील दहा पारमितांपैकी (परिपूर्ण गुणांपैकी) एक महत्त्वाचा गुण आहे.* याचा अर्थ नेहमी खरे बोलणे आणि आपल्या शब्दांशी प्रामाणिक राहणे असा होतो. सत्य पारमितांचे प्रमुख पैलू: सत्य वचन (खरे बोलणे): कोणत्याही परिस्थितीत असत्य न बोलता नेहमी सत्याचे पालन करणे. संकल्पबध्दता: जे बोलायचे ते आचरणात आणणे आणि इतरांना दिलेले वचन पाळणे. आत्मशुध्दी: खोटेपणापासून दूर राहिल्याने मनाची शुध्दी होते आणि आत्मबल वाढते. बोधिसत्त्वाचा गुण: बोधिसत्त्वाला (बुध्दत्व प्राप्त करू इच्छिणाऱ्या साधकाला) पूर्णत्व मिळवण्यासाठी १० पारमिता पार कराव्या लागतात, त्यापैकी सत्य हा सातवा गुण आहे. यास्तव,मी एक बौध्द अनुयायी म्हणून बौध्दजनास अशी विनंती करतो की,बौध्दजनांनी अवगत भाषेच्या रकान्यात त्यांना ज्या भाषा लिहिता वाचता व बोलता येतात तेवढ्याच भाषा लिहाव्यात व पंचशीलांच्या चौथ्या शीलाचे व सत्य पारमितेचे उल्लंघन करू नये. महासभेच्या आवाहनास प्रतिसाद देऊन अवगत भाषेच्या रकान्यात पाली भाषा लिहणे म्हणजे पंचशील व सत्य पारमितेचे उल्लंघन करणे आहे तसेच असे करणे बौध्द शिकवणुकीशी विसंगत वर्तन करणे आहे.असे माझे वैयक्तिक मत आहे. तसे प्रत्येक बौध्दास स्ववतंत्र मत आहेच.

शरद आढाव,
९८३३१७६६६९,भांडुप,मुंबई
दिनांक:२८ मे, २०२६
प्रत:-
मुंबई प्रदेश पदाधिकारी यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित....
१.विलास वानखडे,अध्यक्ष
२.दयानंद बडेकर, सहचिटणीस
३.राजेंद्र सत्वधीर, खजिनदारहा

## इंधन तुटवड्यामुळे नाशिकहून गोवा, हैदराबादच्या विमानसेवेला ब्रेक लागण्याची शक्यता!

**नाशिक :** नाशिककरांची विमान सेवेला चांगली पसंती मिळत असतानाच आता जूनपासून काही दिवस हैदराबाद व गोवा विमान सेवा स्थगित करण्यात येणार असल्याची चिन्ह निर्माण झाली आहेत. आखाती देशात सुरू आलेले युद्ध आणि महागाईचा फटका विमान सेवेलाही बसला आहे. आखाती देशातील युद्धामुळं इंधनाचे दर प्रचंड वाढल्यानं देशातील दोन विमान कंपन्यांनी एटीएफ अर्थात विमान इंधनाचे दर वाढल्याने विमानसेवेमध्ये कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे नाशिकहून नियमित सुरू असलेल्या गोवा तसेच हैदराबादकरिताच्या दोनपैकी एक सेवेला ब्रेक लागू शकतो. यापूर्वीच दिल्लीची दोन पैकी एक सेवा स्थगित करण्यात आली आहे. देशातील एअर इंडिया आणि इंडिगो या दोन मोठ्या एअरलाईन्स जूनपासून देशांतर्गत उड्डाणांमध्ये कपात करणार आहेत. त्यामुळं त्यांच्याकडून मिळणाऱ्या सेवा प्रभावित होणार आहेत.

नाशिकमधून हैदराबादच्या दोन पैकी एक विमान सेवा, तर गोव्याची सेवा स्थगित होण्याची शक्यता आहे. – निमाचे उपाध्यक्ष मनीष रावल

आखाती देशातील युद्धामुळे विमानांचे इंधन प्रचंड महागल्याने एअरलाईन्सचा खर्च वाढला आहे. बाजारात ९० टक्केपेक्षा जास्त भागेदारी असलेल्या या दोन कंपन्यांपैकी एक कंपनी नाशिक विमानतळावरून हैदराबाद, अहमदाबाद, इंदोर, दिल्ली, बंगळुरु, गोवा याकरिता नियमित विमानसेवा देते. दिल्लीकरिता दिवसातून दोन वेळा तर हैदराबादकरिता दोन विमानसेवा आहेत. यापैकी दिल्लीची एक सेवा स्थगित करण्यात आली आहे. जुलैपासून ती नियमित होण्याची शक्यता असतानाच विमान इंधनाच्या दरवाढीमुळे इतर मार्गावरील विमान सेवेमध्ये देखील कपात करण्याची चिन्ह आहेत.

नाशिकमधून ज्या सेवांमध्ये कपात होऊ शकते, त्यात गोव्याची विमान सेवा बंद होण्याची दाट शक्यता आहे. पावसाळ्यामुळे जूनपासून पर्यटनाचा येथील हंगाम थंडावतो. यामुळे या मार्गावरील सेवा स्थगित करणे कंपनीला योग्य ठरू शकते, असं मतं जाणकारांनी व्यक्त केलं आहे. मात्र, नाशिककरांची नेहमीच गोव्याच्या विमान सेवेला पसंती दिसून आली असून, यामुळे पर्यटकांचा हिरमोड होण्याची शक्यता आहे.

आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धामुळे जगभरात इंधन कोंडी निर्माण झाली आहे. एव्हीएशन टर्बाइन फ्युअल या विमान इंधनाच्या दरात ४० ते ५० टक्क्यांनी वाढ झाली. त्याचा विमान कंपन्यांना मोठा फटका सहन करावा लागत असून, सेवेमध्ये कपात करत आहेत. जगभरात हीच स्थिती आहे.

## सातारा सांगलीत भाजप – शरद पवारांच्या राष्ट्रवादीच्या लढतीची चर्चा, शिवसेनेच्या तानाजीराव पाटील यांचा उमेदवारी अर्ज दाखल

**सांगली/प्रतिनिधी :** विधानपरिषदेच्या सातारा सांगली मतदारसंघ महायुतीच्या जागा वाटपात भाजपकडे जाणार असल्याचं चित्र आहे. या म तदारसंघात नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे. सांगली जिल्ह्यातील शिवसेनेचे नेते तानाजीराव पाटील यांनी विधानपरिषद निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. सातारा आणि सांगलीच्या जागेवर भाजप विरुद्ध राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पार्टी अशी निवडणूक होण्याची शक्यता असताना शिवसेनेच्या तानाजीराव पाटील यांच्याकडून उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आल्यानं या मतदारसंघात रंगत निर्माण झाली आहे.सांगली आणि सातारा विधानपरिषद म तदारसंघाच्या निवडणुकीच्या निमित्ताने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, असे तानाजीराव पाटील यांनी म्हटले. माझे नेते स्वर्गीय अनिल बाबर यांच्यासोबत ३०–३२ वर्ष राजकारण आणि समाजकारणात काम करतोय. या ३२ वर्षाच्या कालावधीत मित्रत्वाच्या नात्याने सांगली आणि सातारा जिल्ह्यात मित्रांची संख्या आणि जीवाला जीव देणाऱ्यांची संख्या मिळवलीय ती मोठी आहे. सांगली आणि सातारा दोन जिल्ह्यातील सगळे कार्यकर्ते, नगरसेवक आणि जिल्हा परिषद सदस्यांच्या मागणीमुळं पक्षाकडे उमेदवारीसाठी अर्ज केला.

सुहास बाबर, शंभूराज देसाई यांच्यासोबत जाऊन एकनाथ शिंदे यांच्याकडे उमेदवारी मागितलेली आहे. शिवसेनेच्या वतीने उमेदवारी अर्ज दाखल केला आहे, असं तानाजीराव पाटील यांनी म्हटले.

राजकारणात मी जादा शत्रुत्व कोणासोबत केलेले नाही, राजकारणात मित्रांची संख्या जास्त आहे. निश्चितपणे सगळ्या पक्षाची लोकं मदत करतील अशी अपेक्षा बाळगत असल्याचं तानाजीराव पाटील म्हणाले. सातारा सांगलीच्या जागेवर सगळेच दावा करतात, आम्ही पण दावा करतोय. एकनाथ शिंदे जो काही निर्णय घेतील तो पुढे चालवू, असं तानाजीराव पाटील म्हणाले. दहा सूचकांच्या मार्फत उमेदवारी अर्ज भरला आहे. अर्ज हा ठेवण्यासाठीच भरला आहे, जुळण्या कशा आहेत त्यावर अर्ज ठेवायचा की नाही हे ठरतं, असं तानाजीराव पाटील म्हणाले.

दोन जिल्ह्यात मित्रांची संख्या अधिक आहे, एकमेकांच्या मदतीला आलेलो आहोत. आमचे नेते सुहास बाबर, मंत्री शंभूराज देसाई यांच्यासोबत एकनाथ शिंदे यांच्याकडे सातारा सांगली आपल्यासोबत घ्यावे, असं म्हटल्याचं तानाजीराव पाटील यांनी म्हटले. सर्व मित्रपक्षांची मदत होईल, असंही तानाजीराव पाटील सांगितले.

साताऱ्यात शरद पवारांची राष्ट्रवादी– भाजपच्या लढतीची चर्चा

महाविकास आघाडीच्या जागा वाटपात सातारा सांगलीची जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसकडे गेली आहे. महायुतीत ही जागा भाजपकडे जाण्याची चर्चा आहे. या दरम्यान शिवसेनेच्या तानाजीराव पाटी यांनी उमेदवारी अर्ज भरल्यानं नवा ट्विस्ट निर्माण झाला आहे.

# उपवर्गीकरण हे दलितात दुही व आरक्षण संपवण्याचे षडयंत्र : विचारवंतांच्या ऑनलाइन चर्चासत्रातील सूर

**लातूर/प्रतिनिधी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयुष्यभर सर्व अस्पृश्य जातींना एकसंघ करण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी विविध परिषदेचे आयोजन केले. कारण सर्व अस्पृश्य जाती संघटित असल्याशिवाय त्या आपल्यावरील अन्याय अत्याचारांचा प्रतिकार करू शकणार नाहीत, ही त्याच्या मागील त्यांची भूमिका होती. या भूमिकेतूनच त्यांना सर्व अस्पृश्य जातींनी संघटितपणे धर्मांतर करावे असे वाटत होते. त्याला मातंग समाजाने दोन जून १९३६ रोजी दादर नायगाव येथे मातंग परिषद घेऊन धर्मांतरास पाठिंबा दिला होता पण तत्कालीन हिंदू महासभेच्या लोकानी त्यांना प्रलोभन दाखवून त्यांच्यात व डॉ. आंबेडकरांच्या धर्मांतराविषयी गैरसमज करून दिला. परिणामी मातंग समाज धर्मांतरापासून दूर गेला. त्याचप्रमाणे आज शासन वर्गीकरणाच्या माध्यमातून अस्पृश्य जातीत दुही, द्वेष निर्माण करून असलेले आरक्षण अप्रत्यक्षरीत्या संपवण्याचे षडयंत्र रचत आहे असा सूर लातूर येथे झालेल्या विचारवंतांच्या ऑनलाइन चर्चा सत्रात उमटला.

उपवर्गीकरणाच्या निमित्ताने महाराष्ट्रात मातंग व बौद्ध चर्मकार समाजात परस्पर द्वेष, संघर्ष यातून तणाव निर्माण झाला होता यातून सामाजिक सलोखा धोक्यात आला होता. तो कमी करावा व उपवर्गीकरण विरोध म्हणजे विशिष्ट जातीला विरोध नाही तर यामागे षडयंत्र रचण्याचा शासनाच्या विरोध या भूमिकेतून डॉ. सुरेश वाघमारे यांच्या पुढाकारातून हे चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात राहुल खांडेकर यांनी प्रास्ताविक केल्यानंतर भिक्खू पय्यानंद यांनी चर्चा सत्राविषयीची भूमिका मांडली नंतर या चर्चा सत्रात आनंदराज आंबेडकर, आमदार नितीन राऊत, न्यायमूर्ती अनिल वैद्य, लोकसत्ताचे उपसंपादक मधु कांबळे, माझी आयएएस अधिकारी इ. झेड खोब्रागडे, डॉ. प्रदीप आगलावे, मुंबई विद्यापीठातील इतिहास विभागप्रमुख डॉ. संदेश वाघ, पुणे विद्यापीठातील प्रा. डॉ. संजय कुमार कांबळे व डॉ. जी. के. डोंगरगावकर (मुंबई) इत्यादींनी आपली मतं मांडली.

या चर्चेत असाही विचार मांडला गेला की उपवर्गीकरण आणण्याचा शासनाचा फोडा आणि सत्ता मिळवा असा राजकीय हेतू आहे. ज्याप्रमाणे आज महाराष्ट्रात हिंदू–मुस्लिम, मराठा विरुद्ध ओबीसी संघर्ष पेटवून परस्परात द्वेशाची भावना पेटवली गेली. त्याचप्रमाणे शासन उपवर्गीकरणांच्या माध्यमातून मातंग विरुद्ध बौद्ध व तत्सम जाती यांच्यात वाद निर्माण करू पाहत आहे. शासनाची मागास दलिता विषयीची भावना प्रामाणिक असती तर अस्पृश्य समाजाच्या कल्याणासाठी ठेवलेला निधी त्यांच्यावर खर्च केला असता, तो लाडक्या बहिणीसाठी वळवला नसता, त्यांना खरंच दलितांचे कल्याण करायचे असेल तर त्यांनी खाजगी क्षेत्रात आरक्षण सुरू करावे, नोकऱ्यातील बॅकलॉग भरावा, वर्गीकरणच करायचे असेल तर ब्राह्मण, मराठा व तत्सम जातीचे करावे. प्रत्येक जातीला त्यांच्या जातीच्या प्रमाणात नोकरीत संधी द्यावी. आज विविध महामंडळे आहेत. त्यांना निधी देऊन सक्षम करावे; परंतु शासनाला समाजहितापेक्षा समाजात वितुष्ट निर्माण करण्यात रस आहे. अस्पृश्य समाजातील संघशक्ती तोडण्यात रस आहे. म्हणून शासनाच्या वर्गीकरण धोरणास विरोध आहे. हा विरोध कोण्या जातीला नाही. आजच्या शासनाला सामाजिक समतेपेक्षा समरसता महत्त्वाची वाटते. त्यामुळे सर्व अस्पृश्य जातींनी या अस्पृश्यद्रोही, मुस्लिमद्रोही शासनाचा विरोध केला पाहिजे.

दलितांनी आता 'सिता' साठी नाही तर शेतासाठी संघर्ष करायला शिकले पाहिजे. त्यासाठी एकसंघ राहिले पाहिजे. खरंतर आज सर्व अस्पृश्य जातींना 'बटेंगे तो कटेंगे' या विचारावर लक्ष देण्याची गरज आहे. हे चर्चासत्र यशस्वी करण्यासाठी पूजयनीय भंते पय्यानंद महाथेरो, डॉ. सुरेश वाघमारे, तसेच डॉ. बाळासाहेब गोडबोले, वन अधिकारी जी एस. साबळे, प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे यांनी परिश्रम घेतले. शेवटी राहुल खांडेकर यांनी आभार मानले.

या अभिनव चर्चासत्रास संपूर्ण महाराष्ट्रातून अद्भुत प्रतिसाद मिळाला. १००० पेक्षा अधिक लोक क्या ऑनलाइन चर्चासत्राला जोडले गेले होते.

## भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सावरकरांचा सिंहाचा वाटा: सहकार मंत्री बाबासाहेब पाटील



**अहमदपूर/प्रतिनिधी :** स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात सिंहाचा वाटा असून, त्यांचे विचार कायम प्रेरणादायी आहेत. आजच्या तरुणांनी त्यांचे हे प्रखर विचार आत्मसात करून देशाप्रती आपले कर्तव्य बजावले पाहिजे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी येथे केले.

अहमदपूर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात सावरकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित ध्वजारोहण व रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. व्यासपीठावर नगराध्यक्ष स्वप्निल व्हते, प्रदेश सरचिटणीस शिवानंद हेगणे, बाळू पवार, संपन्न कुलकर्णी, अमोल पोळ यांसह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

पाटील म्हणाले की, महापुरुषांच्या जयंती निमित्त समितीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे ते अत्यंत कौतुकास्पद आहे. रक्तदान ही आजच्या काळाची मोठी गरज असून आपल्या रक्तदानामुळे एखाद्या व्यक्तीचा मौल्यवान जीव वाचू शकतो. त्यामुळे अहमदपूर शहरातील विविध सामाजिक संघटनांनी अशा प्रकारच्या रक्तदान शिबिरांसाठी नेहमीच पुढे येऊन पुढाकार घेतला पाहिजे, असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धनंजय जोशी यांनी केले, तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. मधुसूदन चेरेकर यांनी केले. स्वातंत्र्यवीर चौकाच्या सुशोभीकरणास २० लाख याप्रसंगी स्वातंत्र्यवीर सावरकर चौकाच्या सुशोभीकरणासाठी सहकार मंत्र्यांनी २० लाख रुपयांचा निधी घोषित केला. तसेच या चौकात सध्या असलेला अर्धाकृती पुतळा भविष्यात पूर्णकृती करण्यासाठी आपण स्वतः पुढाकार घेऊ, अशी ग्वाही देखील पाटील यांनी यावेळी दिली.

## भिवंडीत 'मिथेनॉल'चा मोठा साठा जप्त; आयुक्त तुकाराम मुंढे यांच्या निर्देशानुसार एफडीएची धडक कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :** पुणे आणि पिंपरी–चिंचवड परिसरातील फुगेवाडी, दापोडी आणि हडपसर येथे विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे १८ जणांचा मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर भिवंडी येथील मेसर्स रेक्स इंटरनॅशनल या कंपनीवर धाड टाकून मिथेनॉलचा ५,९२९ किलो साठा जप्त करण्यात आला. प्राथमिक तपासात पुणे प्रकरणातील दारूमध्ये वापरण्यात आलेले मिथेनॉल याच कंपनीकडून पुरविण्यात आल्याचे समोर आले आहे.

जनतेच्या आरोग्याशी खेळ करणाऱ्या कोणत्याही व्यक्ती अथवा आस्थापनेला कोणतीही सवलत दिली जाणार नाही. औषधे व सौंदर्यप्रसाधने अधिनियम, १९४० तसेच संबंधित कायदे व नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कायदेशीर व न्यायालयीन कारवाई करण्यात येईल. सुरक्षित अन्न व औषधे हा प्रत्येक नागरिकाचा मूलभूत अधिकार असून तो सुनिश्चित करणे हीच आमची सर्वोच्च जबाबदारी आहे, असे अन्न व औषध प्रशासन आयुक्त तुकाराम मुंढे यांनी म्हटले आहे.

विषारी गावठी दारूच्या सेवनामुळे मृत्यू झाल्याच्या पार्श्वभूमीवर अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) मोठी कारवाई केली आहे. अवघ्या ३० रुपयांत विकल्या जाणाऱ्या या दारूमध्ये 'मिथेनॉल' हे विषारी रसायन मिसळण्यात आल्याचे निष्पन्न झाल्यानंतर आयुक्त तुकाराम मुंढे यांनी राज्यभर मिथेनॉलच्या अवैध साठ्यांविरोधात तातडीने कारवाईचे आदेश दिले.

पोलीस तपासानुसार, मृत व्यक्तींनी फुगेवाडी येथील कर्नालसिंग विरका यांच्या ठिकाणी हातभट्टीची दारू सेवन केली होती. विरका याला ही दारू योगेश वानखेडे याच्याकडून मिळाली होती. पुढील तपासात योगेश वानखेडे हा उरळी कांचन येथील राजू प्रजापती याच्याकडून दारू घेऊन पुरवठा करत असल्याचे निष्पन्न झाले. या साखळीतील दारूमध्ये वापरलेले मिथेनॉल मेसर्स रेक्स इंटरनॅशनलकडून प्राप्त झाल्याचे स्पष्ट झाले आहे.

धाडीमध्ये ५,९२९ किलो मिथेनॉल जप्त

कंपनीचे कार्यालय वाशी येथे असून गोदाम अनंत अँड कंपनी, गाळा क्र. ५४४/ए, म्हात्रे कंपाउंड, अंजूर रोड, वळगाव, भिवंडी येथे असल्याची माहिती मिळाल्यानंतर आयुक्तांच्या निर्देशानुसार ठाणे येथील औषध निरीक्षक योगेंद्र पोळ यांनी धाड टाकली.

तपासणीदरम्यान कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे व सक्षम व्यक्ती अभिषेक अरुणकुमार चौबे उपस्थित नव्हते. कारवाईत एकूण ५,९२९ किलोग्रॅम मिथेनॉलचा साठा आढळून आला. मात्र या विषारी रसायनाच्या खरेदी–विक्रीची कोणतीही अधिकृत नोंद, साठा नोंदवही अथवा आवश्यक कागदपत्रे उपलब्ध नव्हती.

गुन्हा दाखल; परवाना रद्द करण्याची प्रक्रिया सुरू

विषारी द्रव्य नियमांनुसार आवश्यक नोंदी व व्यवहारांचा तपशील उपलब्ध नसल्याने संबंधित साठा जप्त करण्यात आला. तसेच कंपनीचे मालक अरुणकुमार चौबे आणि सक्षम व्यक्ती अभिषेक अरुणकुमार चौबे यांच्याविरुद्ध नारपोली पोलीस ठाणे, भिवंडी येथे तक्रार दाखल करण्यात आली असून पोलिसांनी गुन्हा नोंद केला आहे.

# देशातील पहिल्या एकीकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना साकार : मुख्यमंत्री फडणवीस

– खाजगी गुंतवणुकीतून पहिला प्रकल्प
– १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया; २८ टन गॅसची निर्मिती

**नागपूर/प्रतिनिधी :** देशातील पहिला एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया प्रकल्प भांडेवाडी येथे खाजगी गुंतवणुकीतून साकारत असून या प्रकल्पामुळे कचरामुक्त शहराची संकल्पना प्रत्यक्षात येणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून सुमारे १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होऊन २८ टन प्रतिदिन गॅसची निर्मिती होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे दिली.

भांडेवाडी परिसरात केवा सुस बडे या आंतरराष्ट्रीय उद्योग समूहातर्फे शहरात दररोज निर्माण होणाऱ्या १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रकल्पाची पाहणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले, त्यावेळी ते बोलत होते.



यावेळी महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, आमदार सर्वश्री कृष्णा खोपडे, प्रवीण दटके महापौर नीता ठाकरे उपमहापौर लीना हातीबेड, स्थायी समितीच्या सभापती शिवानी दानी, अल्पसंख्याक आयोगाचे अध्यक्ष प्यारे खान, महानगरपालिका आयुक्त डॉ. विपीन इटणकर, केवा सुसबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर, फायनान्स डायरेक्टर विनोद तणदोन उपाध्यक्ष विजय चिपळूणकर तसेच लोकप्रतिनिधी व अधिकारी उपस्थित होते. एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्र तीन टप्प्यात पूर्ण होणार असून येत्या ऑगस्ट महिन्यापर्यंत शहरातील १ हजार २०० मेट्रिक टन कचऱ्यावर संपूर्ण प्रक्रिया अत्यंत आधुनिक पद्धतीने करण्यात येणार आहे. या प्रकल्पासाठी ओला व सुका कचरा संकलित करून त्यावर प्रक्रिया होणार आहे. या प्रक्रियेनंतर बायोगॅस, कंपोस्ट खत तसेच सुक्या कचऱ्यापासून पावर प्लेट्स इंधन तयार होणार आहे.

भारतातील अशा प्रकारचा हा पहिलाच प्रकल्प आहे या प्रकल्पासाठी नागपूर महानगरपालिकेतर्फे ३० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली असून गॅस विक्रीतून महानगरपालिकेला दरवर्षी १५ लाख रुपयांची रॉयल्टी सुद्धा मिळणार आहे. पर्यावरण पूरक या प्रकल्पासाठी प्रशासनातर्फे आवश्यक सहकार्य करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी दिल्या. एकिकृत शहर घनकचरा प्रक्रिया केंद्रामुळे पुढच्या काळात शहरातील सर्व कचऱ्यावर प्रक्रिया सुलभ होणार असून नागपूर शहर हे घनकचरा व्यवस्थापन तसेच कचरा मुक्त शहर म्हणून संपूर्ण भारतात ओळखले जाईल. या प्रकल्पामुळे पर्यावरणाची हानी होणार नसल्याचेही यावेळी त्यांनी सांगितले.

या प्रकल्पाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या बायोगॅस वर शहरातील १९८ बसेस साठी सीएनजी ही ग्रीन एनर्जी उपलब्ध होणार आहे. खाजगी भागीदारी तत्त्वावर सुरू होणाऱ्या या प्रकल्पासाठी महानगरपालिकेला कुठलाही खर्च येणार नसून शहरात निर्माण होणाऱ्या १ हजार ३०० मेट्रिक टन कचरा व्यवस्थापनावर होणारा दैनंदिन खर्च वाचणार आहे. या प्रकल्पाच्या माध्यमातून चांगल्या प्रतीचे कंपोस्ट खत तयार होईल. महाजनकोसाठी लागणाऱ्या एनर्जी प्लेट्स सुद्धा उपलब्ध होणार आहेत.

कचऱ्यापासून खत व खतापासून बायोगॅस, कंपोस्ट खत, पावर प्लेट्स आदी निर्माण करणारा हा प्रकल्प अत्याधुनिक असल्यामुळे पर्यावरणासाठी आदर्श प्रकल्प म्हणून संपूर्ण भारतात ओळखल्या जाईल, असा विश्वासही यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.

प्रारंभी केवा सुजबडे या प्रकल्पाच्या कार्यकारी संचालक रुंदा ठाकूर यांनी संपूर्ण प्रकल्पाची व घनकचऱ्यावर होणाऱ्या प्रक्रिये संदर्भात माहिती दिली. महापौर नीता ठाकरे व महापालिका आयुक्त डॉ. विपिन इटनकर यांनी या प्रकल्पासाठी महानगरपालिकेतर्फे आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाही दिली.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.